31 DEC 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत आयोजन : १५ दिवस पाहण्यास खुले

# विद्यापीठातील ग्रंथ प्रदर्शनातून उलगडणार दुर्मीळ दस्ताऐवज

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसह नागरिकांनी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्रात आयोजित ग्रंथ प्रदर्शन, मोफत वाचन यांसह आयोजित विविध उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी केले.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रामध्ये आयोजित ग्रंथांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.



विद्यापीठात आयोजित ग्रंथप्रदर्शनातील पुस्तके कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी न्याहाळली. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. धनंजय सुतार व डॉ. प्रकाश बिलावर उपस्थित होते.

या प्रदर्शनात शिवाजी विद्यापीठातर्फे प्रकाशित निवडक २५ ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित १५ ग्रंथ, साहित्य अकादमीकडून प्रकाशित १० ग्रंथ, तसेच ३५ दुर्मीळ संदर्भ ग्रंथ मांडले आहेत. यामध्ये विश्वकोश, नकाशे, इतर संदर्भ ग्रंथांचा समावेश आहे.

दुर्मीळ ग्रंथ विभागामध्ये एकूण १५३ दुर्मीळ ग्रंथ प्रदर्शनात मांडले आहेत. यामध्ये ग्रंथांखेरीज हस्तलिखिते, ताम्रपट तसेच कोल्हापूर परिसरात उत्खननांतर्गत मिळालेल्या वस्तू देखील ठेवल्या आहेत. विशेष म्हणजे विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर विद्यापीठ ग्रंथालयात दाखल झालेले रसायनशास्त्राचे पहिले पुस्तक, माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची स्वाक्षरी असलेली 'अग्निपंख' पुस्तकाची प्रतही प्रदर्शनामध्ये आहे. त्याशिवाय भारतीय राज्यघटनेची दुर्मीळ मूळ प्रत देखील वाचकांना येथे पाहता येणार आहे.

ग्रंथालयशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. शिवराज थोरात उपस्थित होते.

## वाचकांसाठी पुस्तके विनाशुल्क उपलब्ध

हे ग्रंथ प्रदर्शन १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत सुरु राहणार असून, ते सर्वांसाठी खुले आहे. या कालावधीमध्ये बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रातील पुस्तके तेथेच बसून वाचण्यासाठी सर्वांसाठी विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

31 DEC 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन

## सर्वांसाठी १५ दिवस पाहण्यास खुले : पुस्तके मोफत वाचनासाठी उपलब्ध : प्रदर्शनास मान्यवरांची भेट

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी–विद्यार्थिनींसह नागरिकांनी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्रात आयोजित ग्रंथ प्रदर्शन, मोफत वाचन यांसह आयोजित विविध उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रामध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत आयोजित विविध प्रकारच्या ग्रंथांच्या प्रदर्शनाचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी ग्रंथ प्रदर्शनासह संदर्भ ग्रंथ दालनामधील विशेष प्रदर्शनाचीही पाहणी केली. संचालक डॉ. धनंजय सुतार आणि डॉ. प्रकाश बिलावर यांनी प्रदर्शनात मांडलेल्या ग्रंथांची वैशिष्ट्यांची माहिती



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत आयोजित ग्रंथ प्रदर्शनाची पाहणी करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. धनंजय सुतार आदी.

कुलगुरूंना दिली. विद्यापीठातर्फे प्रकाशित निवडक २५ ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित १५ ग्रंथ, साहित्य अकादमीकडून प्रकाशित ९० ग्रंथ तसेच ३५ दुर्मिळ संदर्भ ग्रंथ मांडले आहेत. यामध्ये विश्वकोश, नकाशे आणि इतर संदर्भ ग्रंथांचा समावेश आहे. प्रदर्शनस्थळी निवडक वाचनीय शंभर पुस्तकांची यादी सुद्धा वाचकांच्या सोयीसाठी प्रदर्शित करण्यात आली आहे. दुर्मिळ ग्रंथ विभागामध्ये एकूण १५३ दुर्मिळ ग्रंथ प्रदर्शनात मांडले आहेत. हस्तलिखिते, ताम्रपट तसेच कोल्हापूर परिसरात उत्खननांतर्गत मिळालेल्या वस्तू देखील आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर विद्यापीठ ग्रंथालयात दाखल झालेले रसायनशास्त्राचे पहिले पुस्तक देखील पाहता येणार आहे. माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची स्वाक्षरी असलेली 'अग्निपंख' पुस्तकाची प्रतही प्रदर्शनामध्ये आहे. यावेळी ग्रंथालयशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. शिवराज थोरात यांच्यासह अधिकारी, विद्यार्थी संख्येने उपस्थित होते.

सदरचे ग्रंथ प्रदर्शन १ ते १५ जानेवारी या कालावधीत सुरू राहणार असून ते सर्वांसाठी खुले आहे. या कालावधीमध्ये बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रातील पुस्तके तेथेच बसून वाचण्यासाठी सर्वांसाठी विनाशुल्क उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वाचकांनी केंद्राला भेट देऊन प्रदर्शनाची पाहणी करावी, तसेच त्यांना हव्या त्या पुस्तकांचे वाचन करावे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रामध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत आयोजित ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

मान्यवरांनी ग्रंथ प्रदर्शनासह संदर्भ ग्रंथ दालनामधील विशेष प्रदर्शनाची पाहणी केली. संचालक डॉ. धनंजय सुतार व डॉ. प्रकाश बिलावर यांनी प्रदर्शनात मांडलेल्या ग्रंथांची वैशिष्ट्यांची माहिती कुलगुरूंना दिली. प्रदर्शनात शिवाजी विद्यापीठातर्फे प्रकाशित निवडक २५ ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित १५ ग्रंथ, साहित्य अकादमीकडून प्रकाशित ९० ग्रंथ तसेच ३५ दुर्मीळ संदर्भ ग्रंथ मांडले आहेत. यामध्ये विश्वकोश, नकाशे आणि इतर संदर्भ ग्रंथांचा समावेश आहे. प्रदर्शनस्थळी निवडक वाचनीय शंभर पुस्तकांची यादी वाचकांसाठी प्रदर्शित करण्यात आली आहे. ग्रंथ प्रदर्शन १ ते १५ जानेवारी या कालावधीत सुरू राहणार आहे. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रातील पुस्तके तेथेच बसून वाचण्यासाठी सर्वांसाठी विनाशुल्क उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2024
लोकमत

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त सोमवारी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले. सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठ अतिथीगृहाच्या प्रांगणातील डॉ. पवार यांच्या अर्धपुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर मुख्य प्रशासकीय भवन इमारतीसह डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन येथेही डॉ. पवार यांच्या स्मृतींना अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. महादेव देशमुख, डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. कविता वाळवेकर, डॉ. दीपक भादले, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. जी. पी. माळी, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. एस. जे. नाईक, डॉ. अशोक जगताप, किसनराव कुराडे, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

31 DEC 2024
तरुण भारत

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठ अतिथीगृहाच्या प्रांगणातील डॉ. पवार यांच्या अर्धपुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. मुख्य प्रशासकीय भवन इमारतीसह डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन येथेही अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वृत्तपत्रविद्या व संज्ञापनशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. कविता वाडेकर, डॉ. दीपक भादले, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. जी.पी. माळी, डॉ. सी.एच. भोसले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2024
लोकमत

# गणित अधिविभागात राष्ट्रीय गणित दिन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील गणित अधिविभागात राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा झाला. डॉ. दीपक शेटे यांच्या 'जीवनाचे गणित' या विषयावरील व्याख्यानाने राष्ट्रीय गणित दिनाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी भित्तीपत्रक व प्रतिकृती स्पर्धा पार पडल्या. भित्तीपत्रक स्पर्धेत १ शाळांमधील २० विद्यार्थ्यांनी तसेच प्रतिकृती स्पर्धेत ६ शाळांमधील १३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

गणित अधिविभागातील विद्यार्थ्यांनी रांगोळी स्पर्धेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. गणित अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. सरिता ठकार यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम यशस्वीरीत्या पार पडले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 1 DEC 2021
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय गणित दिन उपक्रमास प्रतिसाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील गणित अधिविभागाच्या वतीने राष्ट्रीय गणित दिनानिमित्त विविध गणितीय उपक्रम आयोजित करून महाविद्यालये, शालेय विद्यार्थी, शिक्षकांमध्ये गणिताची लोकप्रियता वाढवण्याचे काम केले. उपक्रमांना उत्तम प्रतिसाद लाभला. विज्ञान व तंत्रज्ञान शाखेच्या अधिष्ठाता तथा गणित अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. सरिता ठकार यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम यशस्वीरीत्या पार पडले. डॉ. दीपक शेटे यांच्या जीवनाचे गणित विषयावरील व्याख्यानाने राष्ट्रीय गणित दिनाचे उद्घाटन झाले. गणिताची रुची असणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांसाठी भित्तिपत्रक व प्रतिकृती स्पर्धा घेण्यात आल्या. नॅनो सायन्स अधिविभागातील डॉ. पी. जे. पाटील यांचे व्याख्यान झाले. यावेळी गणिताचे निवृत्त प्रा. डॉ. एम. एस. चौधरी, गणित अधिविभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. सरिता ठकार, डॉ. के. डी. कुच्चे, शिक्षणशास्त्र अधिविभागाचे डॉ. व्ही. एस. खंडागळे, नॅनो सायन्स अधिविभागाचे डॉ. पी. जे. पाटील उपस्थित होते.

31 DEC 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शाहू स्मारक भवनात 'तरुण भारत संवाद'चा ३२ वा वर्धापन दिन सोहळा : शुभेच्छांसाठी झाली गर्दी

# शुभेच्छांनी दुणावला ऋणानुबंध

निर्भीड, निष्पक्ष आणि विधायक पत्रकारितेतील मानदंड असलेल्या 'तरुण भारत संवाद'च्या कोल्हापूर आवृत्तीचा ३२ वर्धापन दिन सोमवारी, ३० रोजी मोठ्या दिमाखात साजरा झाला. यानिमित्त 'तरुण भारत संवाद' परिवाराच्यावतीने दसरा चौकातील शाहू स्मारक भवन येथे सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत स्नेहमेळावा आयोजित केला होता. 'तरुण भारत संवाद'चे वाचक, हितचिंतक, जाहिरातदारांसह राजकीय, प्रशासकीय, सांस्कृतिक, क्रीडा, सामाजिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवली. कोल्हापूर जिल्ह्यासह शहरातील अनेक सामाजिक प्रश्न ऐरणीवर आणत जिल्ह्याच्या विकासाचे स्वप्न व जिद्दीने मार्गस्थ करत असलेला 'तरुण भारत संवाद' कोल्हापूरकरांचा आवाज बनल्याचे शुभेच्छा देण्यासाठी सोमवारी स्नेहमेळाव्याला येथे जमलेल्या गर्दीच्या माध्यमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले.



कोल्हापूर : 'तरुण भारत संवाद' परिवारातर्फे ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त सोमवारी शाहू स्मारक भवन येथे आयोजित स्नेहमेळाव्याचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के [illegible] (छाया : [illegible])

विशेष प्रतिनिधी
कोल्हापूर

[illegible]

शुभेच्छांसाठी वर्धापन 'तरुण भारत संवाद' परिवार

[illegible]

31 DEC 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : 'तरुण भारत संवाद' कोल्हापूर आवृत्तीच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त 'महाराष्ट्र व्हिजन' या विशेषांकाच्या प्रकाशनप्रसंगी 'तरुण भारत संवाद'च्या कार्यकारी संचालक रोमा ठाकुर, संचालक सई ठाकुर-बिजलानी, आमदार जयंत आसगावकर, कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, जि.प.चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अरुण जाधव, चिफ मार्केटिंग ऑफिसर उदय खाडीलकर, मुख्य संपादक विजय पाटील, विभागीय संपादक डॉ. श्रीरंग गायकवाड, निवासी संपादक सुधाकर काशीद, जाहिरात व्यवस्थापक (शहर) मंगेश जाधव, जाहिरात व्यवस्थापक (ग्रामीण) आनंद साजणे.

(छाया : रियाज ट्रेनर)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2024
तरुण भारत

# नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने सरत्या वर्षात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे केली आहे. स्वत:ची एसआरपीडी सिस्टीम तयार करून प्रश्नपत्रिका पाठवल्या, हा प्रयोग यशस्वी झाला. प्राथमिक स्वरूपात काही पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका ऑनस्क्रिन तपासण्याचे काम सुरू आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर सर्वच अभ्यासक्रमाचे पेपर ऑनस्क्रिन तपासण्याचा मानस आहे. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा प्रकारात खेळाडूंनी सुवर्ण कामगिरी केली आहे. कुस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी मॅटवरील कुस्ती संकुल विद्यापीठात उभारले आहे.

- विद्यापीठातर्फे ऑनस्क्रिन पेपर तपासणीचा पहिल्यांदाच प्रयत्न
- मॅटवरील कुस्ती संकुलाची उभारणी




## प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांची प्रगती

जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक क्षेत्रातही सरत्या वर्षात मोठी प्रगती झाली आहे. पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्थान मिळवले आहे. दहावी-बारावी परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्हीचा निर्णय झाला आहे. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्येही नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

## विद्यापीठातील सुविधा

- विद्यापीठांतर्गत क्रीडा पदवी अभ्यासक्रम सुरू
- खेळाडूंसाठीच्या वसतिगृहाचे बांधकाम सुरू
- अधिसभेत खेळाडूंच्या दैनंदिन भत्त्यात वाढीचा निर्णय
- २० लाख उत्तरपत्रिका ऑनस्क्रिन तपासल्या जाणार
- एसआरपीडी तयार करून प्रश्नपत्रिका पाठवल्या
- अनेक समाजोपयोगी संशोधनांना मिळाले पेटंट
- 'नॅक'चे विद्यापीठाला 'ए प्लस प्लस' मूल्यांकन
- विद्यापीठांतर्गत अनेक महाविद्यालय स्वायत्त
- कृषी महाविद्यालयाकडून व्हे आंबिलची निर्मिती
- व्यावसायिक अभ्यासक्रम करणाऱ्यांचा टक्का वाढला

- विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या आंदोलनानंतर अनुदानाचा पुढचा टप्पा देण्याचा निर्णय
- माझी शाळा, मुख्यमंत्री शाळा उपक्रमात शाळांना बक्षीस
- शहरस्तरीय विज्ञान प्रदर्शनात पेटंटला पात्र उपकरणांची मांडणी
- स्पर्धा परीक्षांमध्ये कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांची बाजी
- दहावी-बारावी परीक्षेत विभागात कोल्हापूर अव्वल
- शाळांमध्ये अटल टिंकरींग लॅबतून ऑनलाईन अध्यापनाचा प्रयत्न
- जि.प., मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा टक्का वाढला
- विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जनजागृती